## भाग 'अ'

| |
|---|
| जिल्हा न्यायाधीश–२ आणि अतिरिक्त सत्र न्यायाधीश धाराशिव यांचे न्यायालयात<br>(पिठासीन अधिकारी अ.सि.आवटे)<br>निकालाचा दिनांक – ०९.०७.२०२६<br>निशाणी – २९ |

| | |
|---|---|
| फिर्यादी (सा.क्र.१)/<br>तक्रारदार | महाराष्ट्र शासन मार्फत<br>पोलीस निरीक्षक,<br>पोलीस स्टेशन, उस्मानाबाद ग्रामीण |
| अभियोग पक्षातर्फे | सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्री.जे.व्ही.देशमुख |
| आरोपी | उत्तम उर्फ अण्णा रामलींग शिंदे |
| आरोपीतर्फे विधीज्ञ | विधीज्ञ श्री.ए.एस.वरुडकर |

## भाग 'ब'

(फौजदारी आदेशिकाचे प्रकरण VI मधील परिच्छेद ४४ (ii) अन्वये)

| | |
|---|---|
| गुन्हा घडल्याचा दिनांक | ०४.११.२०१४ |
| फिर्याद दाखल दिनांक | ०४.११.२०१४ |
| दोषारोपपत्र पाठविल्याचा दिनांक | ०५.०३.२०१५ |
| दोषारोप निश्चित केल्याचा दिनांक | १२.०४.२०२३ |
| पुरावा सुरु झाल्याचा दिनांक | ०५.०८.२०२५ |
| न्यायनिर्णयासाठी प्रकरण राखून ठेवल्याचा दिनांक | ०३.०७.२०२६ |
| न्यायनिर्णय दिनांक | ०९.०७.२०२६ |
| न्यायनिर्णयातील शिक्षेसंदर्भात आदेशाचा दिनांक | -- |

## आरोपीची माहिती

| आरोपी क्रमांक | आरोपीचे नाव | अटक दिनांक | जामिनावर सोडल्याचा दिनांक | गुन्हयाचे कलम | अंतिम आदेश | शिक्षा | फौ.प्र.सं. कलम ४२८ अन्वये समायोजित (set off) करण्याबाबत कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | उत्तम उर्फ अण्णा रामलींग शिंदे | ०५.११.१४ | ०८.११.१४ | अनु.जाती व अनु. जमाती (अत्याचार प्रतिबंध) कायदा कलम 3(1)(w)(i),3(1)(w)(ii) आणि नागरी हक्क संरक्षण अधिनियम १९५५ कलम ७(१)(ड) | खालील प्रमाणे | .. | ०३ दिवस |

## भाग 'क'

(फौजदारी आदेशिकाचे प्रकरण VI मधील परिच्छेद ४४ (iii) अन्वये)

सरकार पक्षातर्फे देण्यात आलेले साक्षीदार/बचाव पक्षातर्फे साक्षीदार / न्यायालयीन साक्षीदार

अ. अभियोग पक्षः

| सा.क्रं. | साक्षीदरांचे नाव | स्वरुप | निशाणी |
|---|---|---|---|
| १ | फुलाबाई सुर्यकांत देडे | फिर्यादी | १७ |
| २ | प्रियांका सुर्यकांत देडे | साक्षीदार | १८ |
| ३ | रघुनाथ मरीबा कसबे | घटनास्थळ पंच | २२ |
| ४ | बाळासाहेबद शंकर गावडे | सहा. तपासणी अधिकारी | २४ |
| ५ | मोहन अनंतराव विधाते | तपास अधिकारी | २६ |

ब. आरोपी पक्षः

| सा.क्रं. | साक्षीदारांचे नाव | स्वरुप | निशाणी |
|---|---|---|---|
| -- | -- | -- | -- |

क. न्यायालयीन साक्षीदारः

| सा.क्रं. | साक्षीदरांचे नाव | स्वरुप | निशाणी |
|---|---|---|---|
| –– | –– | –– | –– |

न्यायालयामार्फत निशाणी (फक्त आवश्यक कागदोपत्री पुरावा)

| अ.क्र. | निशाणी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| १ | निशाणी पी–१/सा.क्र.१ | फिर्याद |
| २ | निशाणी पी–२/सा.क्र.१ | प्रथम खबर अहवाल |
| ३ | निशाणी पी–३/सा.क्र.१ | फिर्यादीचा फौ.प्र.सं. कलम १६४ अन्वयेचा जबाब. |
| ४ | निशाणी पी–४/सा.क्र.१ | फिर्यादीचा जातीचा दाखला |
| ५ | निशाणी पी–५/सा.क्र.२ | साक्षीदाराचा फौ.प्र.सं. कलम १६४ अन्वयेचा जबाब. |
| ६ | निशाणी पी–६/सा.क्र.४ | घटनास्थळ पंचनामा |
| ७ | निशाणी पी–७/सा.क्र.४ | अटक पंचनामा |
| ८ | निशाणी पी–८/सा.क्र.५ | आरोपीचे जात प्रमाणपत्र |

आरोपीतर्फे मान्य केलेली कागदपत्र निशाणी (फक्त आवश्यक कागदोपत्री पुरावा)

| अ.क्र. | निशाणी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| –– | –– | –– |

मुद्देमालः

| अ.क्र. | निशाणी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| –– | –– | –– |

दिनांक – ०९.०७.२०२६

(अ. सि. आवटे)
जिल्हा न्यायाधीश–२ आणि अतिरिक्त सत्र
न्यायाधीश,धाराशिव.

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| MHOS010008792019 | दाखल दिनांक | - | २३-०३-२०१९ | | |
| | नोंदणी दिनांक | - | २३-०३-२०१९ | | |
| | निकाल दिनांक | - | ०९-०७-२०२६ | | |
| | कालावधी | | वर्षे | महिने | दिवस |
| | एकूण - | | ०७ | ०३ | १६ |

धाराशिव येथील जिल्हा न्यायाधीश–२ आणि अतिरिक्त सत्र न्यायाधीश यांचे न्यायालयात

(पिठासीन अधिकारी अ.सि.आवटे)

विशेष खटला क्रमांक ३६/२०१९

निशाणी –२९

महाराष्ट्र शासन,
मार्फत पोलीस स्टेशन
उस्मानाबाद ग्रामीण ... फिर्यादी

**विरुध्द**

उत्तम उर्फ अण्णा रामलींग शिंदे
वय २० वर्षे, धंदा –फोटोग्राफी व शिक्षण,
रा. घाटंग्री, ता.जि.उस्मानाबाद. ... आरोपी

---------------------------------------------------------

फिर्यादीपक्षाकरिता – सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्री.जे.व्ही.देशमुख.
आरोपीकरिता – विधीज्ञ श्री.ए.एस.वरुडकर.

---------------------------------------------------------

न्यायनिर्णय

(घोषित केल्याचा दिनांक ०९ जुलै, २०२६)

१. आरोपीने भारतीय दंड संहिता कलम ३५४ अ तसेच अनुसुचित जाती व अनुसुचित जमाती (अत्याचार प्रतिबंध) कायदा कलम 3(1)(w)(i), 3(1)

(w)(ii) आणि नागरी हक्क संरक्षण अधिनियम १९५५ कलम ७(१)(ड) अन्वये गुन्हा केला आहे असा आरोप आहे. या प्रकरणाची पार्श्वभूमी थोडक्यात खालीलप्रमाणे आहे.

२. या प्रकरणातील फिर्यादी अनुसुचित जातीची आहे. फिर्यादीला प्रियांका या नावाची एक मुलगी असून घटनेवेळी तिचे वय १७ वर्षे होते. आरोपीसुध्दा फिर्यादीच्या गावचा रहिवाशी आहे. आरोपी अनुसुचित जाती किंवा अनुसुचित जमीतीचा नाही. तो धनगर समाजाचा आहे.

३. फिर्यादीपक्षाचे कथन थोडक्यात असे की दिनांक ०४.११.२०१४ रोजी सकाळी १०.३० वाजता फिर्यादी व तिची मुलगी प्रियांका कपडे धुण्याकरीता गावातील सरकारी दवाखान्याच्या पाठीमागे असलेल्या बंधा–यावर गेल्या होत्या. तेव्हा आरोपी तेथे आला आणि तो पाण्यात दगड मारु लागला. तेव्हा फिर्यादीने त्याला 'तु पाण्यात दगड का मारतोस' असे विचारले असता आरोपीने 'बंधारा काय तुझ्या बापाचा आहे काय?' असे म्हणून तिला 'महारा मांगाच्या बायांनी इथे धुणे धुण्याकरीता यायचे नाही' अशी जातीवाचक शिवीगाळ केली. तसेच 'तुम्ही विधानसभेच्या निवडणुकीत घडयाळाला (राष्ट्रवादी पक्षाला) मतदान का केले, बाणाला (शिवसेना पक्ष) मतदान का केले नाही' म्हणून शिवीगाळ केली. तेव्हा फिर्यादीची मुलगी प्रियांका हिने आरोपीला तुम्ही माझ्या आईला शिवीगाळ का करता अशी विचारणा केली असता आरोपीने तिला 'मी तुला कोठे पोहोचवेण याचा तुला अंदाज येणार नाही' असे म्हणून फिर्यादीच्या जवळ येवून तिच्या हाताला धरुन ओढले तसेच तिच्या साडीचा पदर ओढून तिचा विनयभंग केला.

४. या घटनेनंतर फिर्यादी आपल्या घरी गेली आणि तिने ही घटना तिचा चुलत भाउ कृष्णा यास सांगितली. त्यानंतर ते दोघे उस्मानाबाद ग्रामीण पोलीस

स्टेशनला गेले. तेथे फिर्यादीने रितसर फिर्याद दाखल केली. या फिर्यादीवरुन उस्मानाबाद ग्रामीण पोलीस स्टेशनला गु.र.क्र.१६१/२०१४ नोंद झाला.

५. दिनांक ०४.११.२०१४ रोजी उप विभागीय पोलीस अधिकारी, तुळजापुर या पदावर मोहन विधाते काम करत होते. त्यांचेकडे उप विभागीय पोलीस अधिकारी कार्यालय, उस्मानाबाद या कार्यालयाचा पदभार होता. त्यांनी या गुन्हयाचा तपास केला आहे. त्या दिवशी उस्मानाबाद ग्रामीण पोलीस स्टेशनला पोलिस निरीक्षक गावडे कार्यरत होते. विधाते यांच्या आदेशानुसार गावडे यांनी दिनांक ०५.११.२०१४ रोजी घटनास्थळाचा पंचनामा केला. तसेच त्याच दिवशी आरोपीला या गुन्हयामध्ये अटक केली. त्यानंतर विधाते यांनी साक्षीदारांचे तपास टिपण नोंदवले. फिर्यादी आणि आरोपीचे जात प्रमाणपत्र हस्तगत केले. इतर आवश्यक कागदपत्रे प्रकरणात सामील केली आणि तपास पूर्ण झाल्यानंतर आरोपी विरुध्द दोषारोपपत्र सादर केले.

६. माझ्या पूर्वधिका–याने निशाणी क्र. ४ येथे आरोपीवर दोषारोप निश्चित केला आहे. आरोपीने गुन्हा कबूल केलेला नाही. आरोपीचे म्हणणे थोडक्यात असे आहे की ज्या ठिकाणी फिर्यादी कपडे धूत होती ती जागा आरोपीच्या मालकीची आहे. त्या बंधा–यावर आरोपीच्या मालकीची जनावरे पाणी पितात. त्यामुळे आरोपीने फिर्यादीला त्या ठिकाणी कपडे धू नको असे सांगितले त्याचा राग येवून फिर्यादीने आरोपी विरुध्द खोटी फिर्याद दाखल केली आहे.

७. दोषारोप शाबीत करण्यासाठी फिर्यादीपक्षाने एकूण ५ साक्षीदार तपासले आहेत. त्याचप्रमाणे लेखी पुरावा सादर केला आहे.

८. या प्रकरणामध्ये मी फिर्यादीपक्षाकरीता सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्री.जे.व्ही.देशमुख आणि आरोपीकरीता श्री.ए.एस.वरुडकर वकीलांचा युक्तीवाद

ऐकला.

९. फिर्यादीपक्षाचा पुरावा, आरोपीचा बचाव आणि उभय बाजूंचा युक्तीवाद विचारात घेता प्रस्तुतचे प्रकरण निकाली काढण्याकरीता खालील वादप्रश्न उपस्थित होतात. या वादप्रश्नांना माझी उत्तरे आणि त्यांची कारणे मी खालीलप्रमाणे नोंदवली आहेत.

| अ. क्र. | वादप्रश्न | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | दिनांक ०४.११.२०१४ रोजी सकाळी १०.३० वाजण्याच्या सुमारास घाटंग्री गावातील सरकारी दवाखान्याच्या पाठीमागे असलेल्या बंधा–यावर आरोपीने फिर्यादीचा हात धरला तसेच तिच्या साडीचा पदर ओढला आणि तिचा लैंगिक छळ केला ही बाब फिर्यादीपक्षाने शाबीत केली का ? | नाही. |
| २. | वर नमूद तारीख, वेळी व ठिकाणी फिर्यादी अनुसुचित जातीची आहे याची माहिती असूनही आरोपीने तिच्या संमतीशिवाय लैंगिक हेतूने तिला स्पर्श केला ही बाब फिर्यादीपक्षाने शाबीत केली का ? | नाही. |
| ३. | वर नमूद तारीख, वेळी व ठिकाणी फिर्यादी अनुसुचित जातीची आहे याची माहिती असूनही आरोपीने तिला अश्लील शेरेबाजी केली ही बाब फिर्यादीपक्षाने शाबीत केली का ? | नाही. |
| ४. | वर नमूद तारीख, वेळी व ठिकाणी फिर्यादी अनुसुचित जातीची आहे याची माहिती असुनही | नाही. |

| | | |
|---|---|---|
| | आरोपीने तिला अस्पृश्यतेच्या कारणावरुन तिचा अपमान केला ही बाब फिर्यादीपक्षाने शाबीत केली का ? | |
| ५. | अंतिम आदेश काय? | आरोपीची निर्दोष मुक्तता करण्यात येते. |

## कारणमिमांसा

**वादप्रश्न क्रमांक १ ते ५ करिता –**

१०. पुराव्याची व्दीरुक्ती टाळण्याकरिता मी या सर्व मुद्दयांची उत्तरे एकाच ठिकाणी नोंदवत आहे.

११. फिर्यादी पक्षाने फिर्यादीची साक्ष नि.क्र.१७ येथे नोंदवली आहे. तिने असे कथन केले आहे की घटना दिनांक ०४.११.२०१४ रोजी सकाळी १०.३० वाजता घाटंग्री गावाच्या प्राथमिक आरोग्य केंद्राच्या पाठीमागे असलेल्या बंधा–यावर घडलेली आहे. तिने पुढे असे कथन केले आहे की, घटनेच्यावेळी ती आणि तिची मुलगी प्रियांका कपडे धुत होत्या. तेव्हा आरोपी तेथे आला. आरोपी पाण्यामध्ये दगड फेकत होता. म्हणून तिने त्यास 'माझ्या अंगावर पाणी का उडवतो ?' अशी विचारणा केली. तेव्हा आरोपीने 'बंधारा काय तुझ्या बापाचा आहे काय ?' असे म्हणाला. तसेच 'महारा मांगाच्या स्त्रीयांनी येथे कपडे धुण्यासाठी यायचे नाही' अशी शिवीगाळ केली. त्यावर तिने 'आम्हाला जातीवरुन शिवीगाळ का करतो ?' अशी विचारणा केली असता आरोपी तिच्या जवळ आला आणि तिच्या साडीचा पदर ओढला. जेव्हा तिच्या मुलीने आरोपीला याबाबत विचारणा केली तेव्हा आरोपीने तिला 'तुला मी कोठे पोहचवीण याचा अंदाज लागू द्यायचो नाही' असा दम दिला.

१२. फिर्यादीने पुढे असे कथन केले आहे की आरोपी तिच्या गावातील

राहणारा आहे. त्यामुळे ती त्याला ओळखते. आरोपी धनगर समाजाचा आहे आणि ती मातंग समाजाची आहे. फिर्यादीने पुढे असे कथन केले आहे की या घटनेनंतर ती तिचा भाउ कृष्णा कांबळे याला घेवून पोलीस स्टेशनला गेली आणि तिने फिर्याद(नि.क्र.पी–१) दाखल केली. दुस–या दिवशी पोलीस घटनास्थळी आले होते. तिने पोलीसांना घटनास्थळ दाखवले होते. न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, धाराशिव यांनी फौजदारी प्रक्रिया संहिता कलम १६४ प्रमाणे तिचा जबाब(नि.क्र.पी–३) नोंदवला आहे. फिर्यादीने आपला जातीचा दाखला(नि.क्र.पी–४) सुध्दा शाबीत केला आहे.

१३. उलटतपासामध्ये फिर्यादीने असे कथन केले आहे की ज्या ठिकाणी ती कपडे धुण्याकरीता गेली होती ती जागा आरोपीच्या मालकीची आहे. घटनेपूर्वी सुध्दा ती रोज त्या ठिकाणी कपडे धुण्याकरीता जात होती. गावातील इतर स्त्रीयासुध्दा तेथे कपडे धुण्याकरीता जात होत्या. घटना घडली तेव्हा ती आणि तिची मुलगी दोघीच हजर होत्या.

१४. नि.क्र.(पी–१) येथील फिर्यादीचे अवलोकन केले असता असे दिसून येते की दिनांक ०४.११.२०१४ रोजी ही फिर्याद दाखल केली आहे. या फिर्यादीमध्ये घटनेची तारीख, वेळ आणि ठिकाण नमूद केले आहे. त्याचप्रमाणे घटनेचे सविस्तर वर्णनसुध्दा नमूद केले आहे. फिर्यादीमध्ये आरोपीच्या जातीचा उल्लेख नाही.

१५. नि.क्र.पी–४ येथील जातीच्या दाखल्याचे अवलोकन केले असता असे दिसून येते की फिर्यादी 'मांग' या अनुसुचीत जातीची आहे.

१६. फिर्यादीपक्षाने फिर्यादीची मुलगी प्रियंका हिची साक्ष नि.क्र.१८ येथे नोंदवली आहे. तिनेसुध्दा फिर्यादीप्रमाणे घटनेचे सविस्तर वर्णन कथन केले आहे.

उलटतपासात तिने असे कथन केले आहे की घटनेच्यावेळी ती उस्मानाबाद येथील महाविद्यालयामध्ये शिक्षण घेत होती. तिच्या महाविद्यालयाची वेळ सकाळी ११.४५ ते दुपारी ०४.०० अशी होती. ती नेहमी सकाळी ११.०० वाजता महाविद्यालयामध्ये जाण्यासाठी निघायची. क्वचीत प्रसंगी ती आपल्या आईसोबत कपडे धुण्यासाठी जात होती.

१७. फिर्यादीपक्षाने पंच रघुनाथ कसबे याचा पुरावा नि.क्र.२२ येथे नोंदवला आहे. परंतु हा साक्षीदार फितुर झालेला आहे. या साक्षीदाराच्या पुराव्यामध्ये घटनास्थळ पंचनामा शाबीत करण्यामध्ये फिर्यादीपक्षाला अपयश आले आहे.

१८. फिर्यादीपक्षाने पोलिस निरीक्षक गावडे यांची साक्ष नि.क्र.२४ येथे नोंदवली आहे. त्यांच्या पुराव्यावरुन असे दिसून येते की सन २०१४ मध्ये ते धाराशिव ग्रामीण पोलीस स्टेशन येथे कार्यरत होते. उपविभागीय पोलीस अधिकारी विधाते यांनी त्यांना या गुन्हयामध्ये सहाय्यक तपास अधिकारी म्हणून नेमले होते. त्यांच्या पुराव्यावरुन पुढे असे दिसून येते की त्यांनी प्रथम खबरी अहवाल नोंदवला आहे. त्याचप्रमाणे घटनास्थळाचा पंचनामा (नि.क्र.पी–६) केला आहे. तसेच आरोपीला अटक करुन अटक पंचनामा (नि.क्र.पी–७) केला आहे.

१९. शेवटी फिर्यादीपक्षाने तपास अधिकारी विधाते यांची साक्ष नि.क्र.२६ येथे नोंदवली आहे. त्यांनी असे कथन केले आहे की दिनांक ०४.११.२०१४ रोजी त्यांची नेमणुक उप विभागीय पोलीस अधिकारी, तुळजापुर, जिल्हा उस्मानाबाद या पदावर होती. त्या दिवशी त्यांचेकडे उप विभागीय पोलिस अधिकारी, उस्मानाबाद या कार्यालयाचा पदभार होता. उस्मानाबाद ग्रामीण पोलीस स्टेशन गु.र.क्र.१६१/२०१४ या गुन्हयाचा तपास त्यांनी केला आहे. पोलिस निरीक्षक

गावडे यांना त्यांनी घटनास्थळाचा पंचनामा करण्याचा तसेच आरोपीला अटक करण्याचा आदेश केला होता. त्यानुसार त्यांना घटनास्थळाचा पंचनामा आणि इतर कागदपत्रे मिळाली होती. दिनांक ०५.११.२०१४ रोजी त्यांनी काही साक्षीदारांकडे गुन्हयाबाबत तपास केला. त्यानंतर मंडळ अधिकारी यांना पत्र देवून घटनास्थळाचा नकाशा मिळण्याची विनंती केली. तसेच उप विभागीय दंडाधिकारी यांना पत्र देवून फिर्यादी आणि आरोपी यांचे जात प्रमाणपत्र मिळण्याची विनंती केली. आरोपीचे जात प्रमाणपत्र (नि.क्र.पी–८) या साक्षीदाराने शाबीत केले आहे.

२०. उलटतपासामध्ये विधाते यांनी असे कथन केले आहे की दिनांक ०४.११.२०१४ रोजी त्यांचेकउे उप विभागीय पोलीस अधिकारी कार्यालय, उस्मानाबाद या पदाचा कार्यभार होता असे दर्शविणारे कोणतेही कागदपत्र दोषारोपपत्रासोबत दाखल केले नाहीत. तथाकथीत गुन्हा उप विभागीय पोलीस अधिकारी कार्यालय उस्मानाबाद यांच्या कार्यक्षेत्रात घडला आहे.

२१. फिर्यादीपक्षाने सादर केलेल्या वरील पुराव्यावरुन मी असा निष्कर्ष काढला आहे की फिर्यादीने तिच्या तोंडी पुराव्यामध्ये गुन्हयाची तारीख, वेळ व ठिकाण आणि गुन्हयाचे सविस्तर वर्णन नमूद केले आहे. तिने आपल्या पुराव्यामध्ये फिर्यादसुध्दा शाबीत केली आहे. फिर्यादीच्या पुराव्याचे अवलोकन करता असे दिसून येते की तिने फिर्यादीशी सुसंगत अशी साक्ष नोंदवली आहे. फिर्यादीची मुलगी प्रियांका हिनेसुध्दा तिच्या पुराव्यामध्ये गुन्हयाची तारीख, वेळ, ठिकाण आणि इतर तपशील सविस्तरपणे कथन केला आहे. तिची साक्षसुध्दा फिर्यादीशी सुसंगत आहे. प्रियांका ही घटनेची प्रत्यक्षदर्शी साक्षीदार आहे. घटनेच्या दिवशी ती उस्मानाबाद येथील महा़विद्यालयात शिक्षण घेत होती. परंतु घटनेच्या दिवशी म्हणजेच दिनांक ०४.११.२०१४ रोजी ती महाविद्यालयात हजर होती असे दर्शवणारा कोणताही

पुरावा न्यायालयासमोर नाही. त्यामुळे घटनेच्यावेळी ती सुध्दा आईसोबत कपडे धुण्यासाठी गेली होती हे स्पष्ट होते. फिर्यादी आणि तिची मुलगी प्रियांका यांच्या पुराव्यावरुन हे सुध्दा स्पष्ट होते की त्या दोघीही आरोपीला ओळखत होत्या. कारण आरोपीसुध्दा घाटंग्री गावचा रहिवाशी आहे.

२२. घटनेच्या वेळी फिर्यादीचे वय सुमारे ३५ वर्षे होते आणि तिच्या मुलीचे वय १७ वर्षे होते. आरोपीचे वय २० वर्षे होते.

२३. फिर्यादी आणि तिची मुलगी प्रियांका यांच्या पुराव्यावरुन असे दिसून येते की घटनेपूर्वीसुध्दा फिर्यादी घटनास्थळी कपडे धुण्याकरीता जात होती. त्याचप्रमाणे गावातील अन्य स्त्रीयासुध्दा त्या ठिकाणी कपडे धुण्यासाठी जात होत्या. जेव्हा घटना घडली तेव्हा केवळ फिर्यादी आणि तिची मुलगी या दोघीच तेथे हजर होत्या. आरोपीसुध्दा तेथे हजर होता.

२४. भा.द.वि.कलम ३५४अ (१)(अ) अन्वये गुन्हा शाबीत करण्याकरीता फिर्यादीपक्षाने हे शाबीत करणे आवश्यक आहे की आरोपीने फिर्यादीला स्पर्श केला तसेच लैंगीक शेरेबाजी केली आणि तिचा छळ केला.

२५. प्रस्तुत प्रकरणामध्ये वर नमूद केल्याप्रमाणे फिर्यादी घटनेच्या ठिकाणी नेहमी कपडे धुण्याकरीता येत होती. तिच्या गावातील अन्य स्त्रीयासुध्दा त्या ठिकाणी कपडे धुण्याकरीता येत होत्या असे दिसून येते. त्यामुळे केवळ घटनेच्या दिवशी आरोपीने फिर्यादीला त्या ठिकाणी कपडे धुण्यास मज्ञाव का केला? याचे कोणतेही स्पष्टीकरण फिर्यादीपक्षाने दिलेले नाही. त्याचप्रमाणे घटनेच्यावेळी फिर्यादी आरोपीपेक्षा वयाने बरीच मोठी होती. तसेच तिच्यासोबत तिची मुलगी प्रियांका ही सुध्दा होती. या सर्व गोष्टींचा विचार करता आरोपीने फिर्यादीचा हात धरला किंवा तिच्या साडीचा पदर ओढला तसेच तिचा लैंगीक छळ

केला हे फिर्यादीचे कथन पटण्यासारखे नाही.

२६. या प्रकरणामध्ये आरोपीने तो घटनास्थळी हजर होता आणि फिर्यादी अनुसुचित जातीची आहे ही बाब मान्य केली आहे. आरोपीने फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ३१३ अन्वये नोंदवलेल्या जबाबामध्ये तो धनगर समाजाचा आहे आणि फिर्यादी अनुसुचित जातीची आहे ही बाब स्पष्टपणे मान्य केली आहे. त्याचप्रमाणे फिर्यादीपक्षाने सादर केलेल्या तोंडी आणि लेखी पुराव्यांवरुन हे स्पष्ट होते की फिर्यादी अनुसुचित जातीची आहे आणि आरोपी अनुसुचित जातीचा किंवा अनुसुचित जमातीचा नाही.

२७. तरी सुध्दा या प्रकरणामध्ये फिर्यादी पक्षाला अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमाती (अत्याचार प्रतिबंध) कायद्याअन्वये नोंद झालेले गुन्हे शाबीत करण्यामध्ये अपयश आले आहे. अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमाती (अत्याचार प्रतिबंध) नियम १९९५ मधील नियम ७ अन्वये या अधिनियमाच्या अंतर्गत दाखल झालेले गुन्हे तपास करण्याचा अधिकार केवळ पोलीस उप अधिक्षक किंवा त्यावरील दर्जाच्या पोलीस अधिका-यांना आहेत. या प्रकरणामध्ये उक्त कायद्याप्रमाणे पोलीस अधिक्षक यांनी लेखी आदेशाद्वारे तपास अधिका-याची नेमणुक करणे आवश्यक आहे. फिर्यादीपक्षाच्या मते पोलीस उप अधिक्षक विधाते यांनी या गुन्हयाचा तपास केला आहे. फिर्यादी पक्षाच्या मते दिनांक ०४.११.२०१४ रोजी उप विभागीय पोलीस अधिकारी कार्यालय, तुळजापुर या पदावर विधाते कार्यरत होते आणि त्यांचेकडे उप विभागीय पोलीस अधिकारी कार्यालय, उस्मानाबाद या कार्यालयाचा पदभार होता. परंतु विधाते यांचेकडे उप विभागीय पोलीस अधिकारी कार्यालय, उस्मानाबाद या कार्यालयाचा पदभार होता असे दर्शवणारे कोणतेही कागदपत्र दाखल केलेली नाहीत. त्याचप्रमाणे पोलीस अधिक्षक,

उस्मानाबाद यांनी विधाते यांची तपास अधिकारी म्हणून नेमणुक केली आहे असे दर्शवणारे कोणतेही कागदपत्र सादर केलेली नाहीत.

२८. या प्रकरणामध्ये पोलीस निरिक्षक गावडे यांनी प्राथमिक तपास केला आहे. त्यांनी घटनास्थळाचा पंचनामा केला आहे आणि आरोपीला या गुन्हयामध्ये अटक केली आहे. माझ्या मते पोलीस निरीक्षक गावडे यांना या गुन्हयाचा तपास करण्याचा अधिकार नव्हता. त्यामुळे त्यांनी केलेला गुन्हयाचा तपास बेकायदेशीर आहे. विधाते यांना गावडे यांचेकडे तपास सोपवण्याचा कायदेशीर अधिकार नाही.

२९. वरील विवेचनांवरुन हे स्पष्ट होते की पोलिस निरीक्षक गावडे यांना अधिकार नसतानासुध्दा त्यांनी या गुन्हयाचा तपास केला आहे. त्याचप्रमाणे पोलीस उप अधिक्षक, उस्मानाबाद किंवा वरिष्ठ अधिका–यांनी तपास अधिकारी म्हणून विधाते यांची नेमणुक केल्याचा कोणताही पुरावा या न्यायालयामध्ये सादर केला नसल्यामुळे अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमाती (अत्याचार प्रतिबंध) नियम १९९५ मधील नियम ७ याचे उल्लंघन झालेले आहे. त्यामुळे या संपूर्ण गुन्याचा तपास बेकायदेशीर ठरतो.

३०. वर नमूद कारणामुळे वाद प्रश्न क्र.१ ते ४ शाबीत करण्यामध्ये फिर्यादी पक्षाला अपयश आले आहे असा निष्कर्ष मी काढला आहे. त्यामुळे या प्रकरणामध्ये आरोपी निर्दोष मुक्त होण्यास पात्र आहे. या निष्कर्षावरुन मी खालीलप्रमाणे अंतीम आदेश करतो.

## आदेश

१. फौजदारी प्रक्रिया संहिता कलम २३५ (१) अन्वये आरोपी उत्तम उर्फ अण्णा रामलींग शिंदे यांना उस्मानाबाद ग्रामीण पोलीस स्टेशन गु.र.नं.१६१/२०१४ भारतीय दंड संहिता कलम ३५४ अ तसेच अनुसुचित जाती व अनुसुचित जमाती (अत्याचार प्रतिबंध) कायदा

कलम 3(1)(w)(i),3(1)(w)(ii) आणि नागरी हक्क संरक्षण अधिनियम १९५५ कलम ७(१)(ड) या गुन्हयांतून निर्दोष मुक्त करण्यात येते.

२. आरोपीचे जातमुचलके रद्द करण्यात येतात.

३. आरोपीने फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ४३७–अ अन्वये रुपये ५०,०००/– चा वैयक्तीक जातमुचलका दयावा.

स्वाक्षरीत/–

दिनांक – ०९.०७.२०२६

(अ. सि. आवटे)

जिल्हा न्यायाधीश–२ आणि अतिरिक्त सत्र न्यायाधीश,धाराशिव.

CERTIFICATE

I affirm that, the contents of this P.D.F. file judgment/ order are same, word to word, as per the original Judgment.

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | : | M. K. Shinde<br>Stenographer (Grade-I) |
| Court | : | District Court-2 & Addl. Sessions Court, Osmanabad. |
| Date | : | 09.07.2026 |
| Order signed by the Presiding Officer on | : | 09.07.2026 |
| Order uploaded on | : | 09.07.2026 |